
ज्ञान-विज्ञान विमुक्तये

Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal
(Journal No. 40776)

ISSN 2277 - 5730

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL




Volume-VIII, Issue-I
January - March - 2019
Marathi Part - II

IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com

# AJANTA

AJANTA
PRAKASHAN

## EDITORIAL BOARD

**Dr. Jagdish R. Baheti**
H.O.D. S. N. J. B. College of Pharmacy,
Meminagar, A/P. Tal Chandwad, Dist. Nashik.

**Dr. Sadique Razaque**
Univ. Department of Psychology,
Vinoba Bhave University,
Hazaribagh, Jharkhand.

**Prof. Ram Nandan Singh**
Dept. of Buddhist Studies University of Jammu.

**Dr. B. S. Pimple**
Principal, ACS College, Shankarnagar,
Tq. Biloli, Dist.- Nanded.

**Dr. A. C. Sonkamble**
ACS College, Shankarnagar,
Tq. Biloli, Dist.- Nanded.

**Dr. S. K. Lekhane**
ACS College, Shankarnagar,
Tq. Biloli, Dist.- Nanded.

**Dr. S. N. Kabadi**
ACS College, Shankarnagar,
Tq. Biloli, Dist.- Nanded.

**Dr. J. S. Cherekar**
ACS College, Shankarnagar,
Tq. Biloli, Dist.- Nanded.

**Dr. R. D. Shinde**
ACS College, Shankarnagar,
Tq. Biloli, Dist.- Nanded.



PUBLISHED BY

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)



# BHASKARRAO PATIL KHATGAONKAR

BJP

State Vice President - Bhartiya Janta Party (Maharashtra)
Ex. Member of Parliament (LokSabha) Nanded

Rajendra Nagar, Nanded-431602, Ph. : Office : 02462-256789, 255555, email : bbpatilmp@gmail.com


## Message

"Democracy" is the Government by the people, for the people and, from the people. It owes equal opportunities to the people from all strata of society without any discrimination. But as per the changing times, it seems that Democracy has lost its true fervor in the true sense of the term. It is invariably changing amidst certain circumstances that are badly affecting it. The Nation is progressing with a steady pace since we got the Independence, but still there are certain threats and challenges in the way of democracy. For good governance democracy should be flawless.

I feel immense pleasure that the Public Administration and Political Science departments of our college are organizing and ICSSR New Delhi sponsored Two Day's National Level Seminar on, "Democracy in the 21st century India: challenges and ways forward". Many stalwarts and scholars are going the shed light on the subject in discourse. I am sure that their deliberations will bring out some sustaining solutions on threats posed on Indian Democracy. The discussion held over here will surely help the emerging scholars for their future research works.

As the president of Godavari Manar Charitable Trust on this occasion, I extend a heartily welcome to all scholars dignitaries from state and country on their arrival over here.

Bhaskarrao Patil Khatgonkar
Chairman,
Godavari Manar Chartiable Trust
Shankarnagar Tq.Biloli

VOLUME - VIII, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2019
**AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)**

# CONTENTS OF MARATHI PART - II



| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | भारतीय लोकशाहीचे स्वरुप व त्यापुढील दहशतवादाचे आव्हान - एक अभ्यास<br>**प्रा. डॉ. श्यामसुंदर वाघमारे** | १-४ |
| २ | भिल्ल आदिवासी स्त्रियांच्या शैक्षणिक समस्या (संदर्भ : किनवट तालुका)<br>**प्रा. डॉ. विजया साखरे** | ५-८ |
| ३ | खेळ जगतात संघटन व प्रशासनाचे महत्व<br>**प्रा. डॉ. जुझारसिंघ निर्मलसिंघ सिलेदार** | ९-१० |
| ४ | भारतीय समाजरचनेती लिंग असमानता : एक सामाजिक समस्या<br>**प्रा. डॉ. संभाजी नारायणराव कबाडी** | ११-१३ |
| ५ | सांप्रदायिकता : समस्या व उपाय<br>**प्रा. सुभाष रामराव रगडे** | १४-१८ |
| ६ | भारतीय लोकशाही व आर्थिक सुधारणा<br>**डॉ. चंद्रकांत वामनराव गजेवाड** | १९-२२ |
| ७ | विस्थापनाचा स्त्रियांवर झालेला परिणाम (संदर्भ लोअर दुधना प्रकल्प)<br>**प्रा. डॉ. सुरेश वि. धनवडे** | २३-२७ |
| ८ | भारतीय समाजातील स्त्री समस्या - स्त्रीभ्रूणहत्या एक अवलोकन<br>**प्रा. गजानन आनंता देवकर** | २८-३१ |
| ९ | लोकशाहीचा सिध्दांत आणि भारतीय लोकशाहीच्या संदर्भातील निरीक्षणे<br>**प्रा. डॉ. रामचंद्र गायकवाड** | ३२-४२ |
| १० | भारतीय लोकशाही समोरील आव्हान : पर्यावरण संवर्धन<br>**डॉ. गंगणे जीवन सुदामराव** | ४३-४७ |
| ११ | भारतीय अनुसूचित जातींच्या सामाजिक व आर्थिक समस्या<br>**प्रा. डॉ. गोरे बी. एम.** | ४८-५० |
| १२ | भारतीय लोकशाही समोरील आव्हाणे<br>**प्रा. डॉ. हिंगोले आर. जी.** | ५१-५४ |
| १३ | समाजातील अल्पसंख्याकांच्या समस्या<br>**डॉ. जीवन ए. चव्हाण** | ५५-५८ |

आंतरराष्ट्रीय स्तरावर खेळाचे आयोजन करीत असतांना उदा. आशियाई क्रीडा स्पर्धा, राष्ट्रमंडळ क्रीडा स्पर्धा, कॉमनवेल्थ क्रीडा स्पर्धा, विश्वचषक स्पर्धा, जगातील सर्वात मोठी ऑलिम्पीक क्रीडा स्पर्धा तसेच फुटबॉल विश्वकप स्पर्धा, हॉकी विश्वकप स्पर्धा, क्रीकेट विश्वचषक स्पर्धा असे अनेक स्पर्धांचे आयोजन करतांना आयोजन योग्य प्रकारे व व्यवस्थीतपणे दर्जेदार पणे करण्यासाठी त्या त्या खेळातील अस्तित्वात असलेली क्रीडा संघटना कार्यक्रम आखत असते व ते राबवित असते. वरील स्पर्धा जागतीक पातळीवर व्यवस्थितपणे आयोजनासाठी दर चार वर्षांनी आयोजित केल्या जातात कारण स्पर्धांचे व्यवस्थित संघटन व प्रशासन करण्यासाठी त्यांना तेवढा कालावधी लागतो. कारण खेळात सहभागी होणाऱ्या देशांची व खेळाडूंची संख्या अधिक असते त्यांच्या खेळासाठी दर्जेदार क्रीडांगण, इंनडोअर हॉल, जलतरणिका व खेळ प्रकारानूसार मैदान, साहित्य, निवास, प्रवास,भोजन, सुरक्षितता, पंच, प्रमुख व्यक्ति, अशा अनेक प्रकारच्या व्यवस्था कराव्या लागतात व त्या दरवर्षी करणे शक्य नसते म्हणून ह्या स्पर्धा ज्या ठिकाणी आयोजित करण्यात आल्या त्याच ठिकाणी पूढील चार वर्षांनी संबंधीत स्पर्धा कोणत्या देशात होणार याची घोषण केली जाते. फुटबॉल मध्ये तर पुढील आठ वर्षानंतर स्पर्धा कोठे होणार याची घोषणा आठ वर्ष अगोदर केली जाते या वरूनच स्पर्धा जागतीक पातळीवर किती लोकप्रिय व महत्वाची आहे हे दिसून येते. देशाच्या सहभागी संख्येनूसार व खेळाडूंच्या संख्येनूसार इतर काही स्पर्धा प्रत्येक दोन वर्षानंतर किंवा एका वर्षानंतर आयोजित केल्या जातात.

खेळ जगतात खेळाचे उद्दिष्ट साध्य करण्याकरीता योग्य संघटन व योग्य प्रशासनाची आवश्यकता असते त्यामुळे शिस्तशीरपणा व नियोजनानूसार कार्यक्रम राबविण्यास मदत होते, कारण खेळात शिस्तीला व वेळेला अतिशय महत्व आहे. योग्य संघटन व प्रशासनाशिवाय क्रीडा कार्यक्रम राबविणे अशक्य आहे.

**संदर्भ ग्रंथ**

१) खेळ संचालन क्रीडा मार्गदर्शन - प्रा. सिलेदार, प्रा. परिहार
२) शारीरिक शिक्षण तत्वे व व्यवस्था - प्रा. हिराजी पाटील
३) शारीरिक शिक्षण विकास व नियोजन- प्रा. भा.रा.गोगटे
४) Sports Management- Prof.Yadvindersingh





# ४. भारतीय समाजरचनेती लिंग असमानता : एक सामाजिक समस्या

**प्रा. डॉ. संभाजी नारायणराव कबाडी**
सहयोगी प्राध्यापक, रसायनशास्त्र विभाग प्रमुख, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, शंकरनगर, ता. बिलोली जि. नांदेड.

**प्रस्तावना**

लिंग असमानता ही लोकसंख्याशास्त्रीय संकल्पना आहे. हे जरी खरे असले तरी त्याचा परीणाम हा समाजावर पडत असतो. तसेच ही संकल्पना आंतरविद्याशाखीय आहे. स्त्री लिंगाचे घटते प्रमाण ही एक चिंताजनक समस्या आहे. दुसरीकडे भेडसावणारी लोकसंख्या वाढ अशा स्थितिमध्ये भारतीय समाज वाटचाल करत आहे. आरोग्य सुविधा, साक्षरता, सुख सुविधा, आधुनिक साधनाचा वापर आदी घटकामुळे मृत्युदर झपाटयाने कमी होत असतांना जन्मदरात सतत होणारी वाढ यामुळे एकेकाळी 33 कोटी लोकांचा असणारा भारत आज 122 कोटीचा झाला आहे.[1] जगाच्या एकूण भूभागापैकी 2.4 टक्के भूभागावर स्थिरावला आहे. भारत देश आज लोकसंख्येत जगात दुस–या कमांकावर आहे. एकूण लोकसंख्ये पैकी 63 कोटी लोकसंख्या पुरुषांची असून स्त्रियांची लोकसंख्या 60 कोटी एवढी आहे. देशाचे सरासरी लिंग गूणोत्तर प्रमाण 1 हजार पुरुषामागे 940 स्त्रिया एवढं आहे. ही समाजासाठी धोक्याची घंटा आहे. UNFPA च्या अंदाजानुसार 2001 ते 2007 या वर्षात भारतात 6 लाख मुली गर्भपात करण्यात आले आहेत[2]. यात आघाडीवर आहेत पंजाब, हरियाना, जम्मू–काश्मीर, दिल्ली, राजस्थान इत्यादी. महाराष्ट्रातल्या 55 हजार मुली जन्मापूर्वीच गायब झाल्या आहेत.

भारतीय लोकसंख्येमध्ये स्त्रियांचे प्रमाण कमी आहे हे अगदी पहिल्या जनगणनेच्या आकडेवारीतून म्हणजे 19 व्या शतकाच्या उत्तरार्धातच लक्षात आले होते. यानंतरच्या शंभर वर्षाच्या काळात लोकसंख्येतील लिंगगुणोत्तराचे प्रमाण स्त्रियांच्या दृष्टीने अधिकाधिक खालावत गेलेले दिसते. 1901 मध्ये हजार पुरुषांच्या मागे स्त्रियांचे प्रमाण 972 होते, तर 2001 मध्ये ते 933 पर्यंत खाली घसरले[3].

भारतीय समाजरचनेतील लिंग असमानतेवर देश, विदेशातील विद्वानांनी विविधांगी संशोधनपर अध्ययन केले आहे. यापैकी उपलब्ध व विषयास अधिक समर्पक अशाच घटनांचा आढावा प्रस्तुत शोध निबंधात घेतला आहे. याच अनुशंगाने उपर्यूक्त शिर्षकावरुन प्रस्तुत विवेचन पुढील उद्यीष्टांना अनुसरुन केले आहे.

१. भारतीय समाजातील 'लिंग असमानता' समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून आकलन करणे.
२. लिंग असमानता आणि समाज यामधील परस्पर संबंध जाणून घेणे.
३. संशोधनाद्धारे 'लिंग असमानता' या संकल्पनेचा अभ्यास करणे.
४. उत्तरआधुनिकतेत लिंग असमानतेचे महत्व जाणणे.
५. संकलित माहितीचे विश्लेषण करणे.

प्रस्तुत शोधनिबंधासाठी वर्णनात्मक संशोधन आराखडा वापरण्यात आला आहे. तसेच शोधनिबंधात दुय्यम स्त्रोतांचा उपयोग, नियतकालीके, शासकीय लेख, वर्तमानपत्रे, वैचारीक लेख, संकेत स्थळे इत्यांदीचा वापर करण्यात आला आहे.

भारताची संस्कृती ही जगातील प्राचीन संस्कृतींपैकी एक आहे. इथली मूल्ये, कुटुंबव्यवस्था, स्त्रीला प्राचीन काळापासुन मिळणारा मानसन्मान हा भौतिकदृष्ट्या पुढारलेल्या पाश्चिमात्य जगाच्या कुतुहलाचा कायमचा विषय ठरलेला आहे.[4] यत्र नार्यस्तु पुज्यते,रमन्ते तत्र देवताः म्हणजे जिथे स्त्रियांचा मानसन्मान केला जातो, तिथे देवता वास करतात, अशा अर्थाचे जुने सुभाषित आपल्याकडे आहे. स्त्री आणि पुरुष ही समाजरथाची दोन चाके आहेत. सुदृढ, निरोगी समाजाच्या जडणघडणीसाठी स्त्रीपुरुष प्रमाणाचा समतोल नैसर्गिकरित्या राखणे आवश्यक आहे. मात्र अलिकडच्या काळात अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमाचा चुकीचा वापर करुन हा समतोल कृत्रिमरित्या ढासळला जात आहे. मुलगा हा वंशाचा दिवा, त्यामुळे मुलगाच हवा, ही अत्यंत चुकीची भावना यामागे आहे. ही भावना नष्ट करणे हे आपल्या सर्वासमोरचे सर्वात मोठे आव्हान आहे.

स्त्रिलींगाच्या घटत्या प्रमाणाचे कारण शोधण्याचा भारतातील समाजशास्त्रज्ञ, जनगणना अधिकारी आणि स्त्री चळवळीत काम करणारे कार्यकर्ते या सर्वांनी विविध अंगांनी प्रयत्न केला आहे. काही वेळा काही भागातील मुलींची नोंदणीच बालविवाह प्रथेमुळे झाली नसण्याची शक्यता दिसते. काही ठिकाणी स्थलांतरामुळेही आकडेवारीत मुलींची नोंदणी कमी झाली असण्याची शक्यता वर्तविली जाते; परंतु 1971 च्या विसारिया अहवालाने निश्चितपणे असे दाखवून दिले आहे, की स्त्रियांचे घटते प्रमाण हे प्रामुख्याने स्त्रियांचे वाढत्या मृत्युदराशी जोडलेगेले आहे. 1980 पर्यंतच्या काळात पुरुषापेक्षा स्त्रीयांचे आयुष्य आकडेवारीनुसार 2 ते 3 वर्षांनी कमी होत.[5] अगदी अलीकडे 1990 पासून मात्र ही आकडेवारी बदलताना दिसते. स्त्रियांना शारीरिकदृष्ट्या निसर्गाने अधिक चिवट आयुष्य दिले असूनही, भारतातील स्त्रियांचा हा उच्च मृत्युदर आपल्याला असे सांगतो, की येथील सामाजिक व्यवहार आणि सांस्कृतिक जडणघडण यामुळे अनेक प्रांतांमध्ये स्त्रीजीवन हीन दर्जाचे, अवमूल्यित स्वरुपाचे होते. महाराष्ट्रातील काही भागात स्त्रिया आणि मुलींचे प्रमाण कमी आहे असे दिसते. 1981, 1991, 2001 आणि 2011 या काळातील जनगणनांचे अहवाल पाहिले, तर असा निष्कर्श निघतो, की पूर्वी पारंपारिक पध्दतीने बालिकांचा एकतर दुर्लक्ष करुन कुपोषन करुन, जन्मल्याबरोबरच नख लावून छळ केला जात असे. मात्र आता नव्या तंत्रज्ञानाच्या साहयाने अर्भकावस्थेतच मुलींना जन्म घेण्यास मनाई केली जात आहे. मुख्य म्हणजे बालीकांचा गर्भ अर्भकावस्थेतच पाडून टाकण्याची रीत संपूर्ण जगाने विकसित आणि विकसन शील सारख्याच प्रमाणात अवलंबिली आहे. एकीकडे आपला देश महासत्ता होण्याच्या दिशेने पावले टाकताना विकासाचा वाढता दर आणि वाढती साक्षरता याविषयी मोठया गौरवाने जाहीरनामे काढीत आहे आणि याच काळात जन्म घेण्यापूर्वीच अनेक मुलींचे अर्भकावस्थेतच श्वास बंद केले जात आहेत. 1991 पासून आतापर्यंत उपलब्ध आकडेवारीनुसार महाराष्ट्रातील अनेक जिल्हयांमध्ये अर्भकावस्थेतील मुलामुलींच्या लिंगगुणोत्तरामध्ये दरी पडत चालल्याचे दिसते.[6] महाराष्ट्रासारख्या प्रगत राज्यात आज मुलींचे प्रमाण दिवसेंदिवस कमी होत आहे, ही चिंतेची बाब आहे. महाराष्ट्रात 1991 मध्ये दर एक हजार मुलांमागे मुलींचे प्रमाण 946 हाते, ते प्रमाण 2011 च्या जनगणनेनुसार मुलींचे प्रमाण आणखी 30 ने कमी होउन ते 883 एवढे झाले आहे. आज मुलगी जन्माला येण्याचा हक्कच हिरावून घेतला जात आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग किंवा दुरुपयोग करुन जन्माआधीच मुली मारल्या जात आहेत, ही बाब अतिशय गंभीर आहे. त्यामुळे भविष्यात अनेक अडचणी निर्माण होणार आहेत.

लिंगभेदाचे वाढते प्रमाण आणि लिंगचाचणी ही केवळ ग्रामीण भागातच बालिकांच्या अशा हत्या होताहेत असे नसून, शहरी मध्यमवर्गीय समाजामध्ये घडत आहे.[7] जी कुटुंबे आता जागतिकीकरणाच्या, उत्तरआधुनिकरणाच्या लाटेत मोठया प्रमाणात व्यापारात आणि परदेशीय नोकरीसाठी जात आहेत, अशा कुटुंबांमध्येच अतिशय थंड डोक्याने विचारपूर्वक, वैज्ञानिकरीत्या बालिकांच्या हत्या केल्या जात आहेत. लिंगभेदाचे वाढते प्रमाण आणि लिंगचाचणी करुन





गर्भपात करण्याचे जे षड्यंत्र आहे त्याकडे आपण सर्वांनीच गांभीर्याने पाहिले पाहिजे. या दुष्कृत्यामध्ये विशेषतः अत्यंत कुशल प्रशिक्षित असे डॉक्टर आणि सुशिक्षित म्हणवून घेणारे मध्यमवर्गीय स्त्री–पुरुष सहभागी होताना दिसतात. पहिली मुलगी झाल्यानंतर दुस–या मुलीला जन्म देणे परवडत नाही म्हणून उपलब्ध तंत्रज्ञानाच्या आधारे गर्भपात करणे यात तार्किकदृष्टया कोणतीही चूक नाही असा विचार सुशिक्षित पालक करत असावेत येथे आणखी एक महत्वाचा मुद्दा मांडावासा वाटतो, तो म्हणजे प्रगत वैद्यकीय तंत्रज्ञानाच्या आधारे केले जाणारे गर्भपात फारच सहजपणाने आणि कोणतीही धास्ती किंवा दडपण मनावर न ठेवता केले जातात.[8] यामध्ये स्त्रिया सहभागी असतात, इतकेच नव्हे, तर पुढाकार घेतात. परंतु संपूर्ण भूल देउन केली जाणारी गर्भपाताची शस्त्रक्रिया हा स्त्री शरीरामध्ये केलेला फार माठा हस्तक्षेप असतो आणि त्यामध्ये होणरा रक्तस्त्राव आणि शारीरिक हानी काही वेळा जीवघेणी ठरु शकते, याचे भान मात्र कोणालाच दिसत नाही.

**निष्कर्ष**

2011 च्या जनगणनेनुसार देशातील एक हजार पुरुषांमागे 940 स्त्रिया आहेत. महाराष्ट्रात हे प्रमाण 925 आहे. महाराष्ट्राच्या शहरी लोकसंख्येचा विचार केला तर हे प्रमाण दर हजारी 899 आणि ग्रामीण भागात 948 आहे. 0 ते 6 या वयोगटातील मुला–मुलींचे राज्यातील सरासरी प्रमाण दर हजार मुलांमागे 883 मुली आहे. शहरी भागात हे प्रमाण 888, तर ग्रामीण भागात 880 आहे. ही आकडेवारी फारच चिंताजनक आहे. नांदेड जिल्हा लिंग गुणोत्तराचे प्रमाण दर 1 हजार मुलांमागे 897 एवढे आहे. हे प्रमाण ग्रामीण भागात 903 तर शहरी भागात 882 एवढे आहे. थोडक्यात, जागतिकीकरणाचे विकृत, उन्मादी, हिंसक रुप बदलून लिंगभेद, लिंगतपासणी, स्त्रीभ्रूणहत्या, ही मोठया आजाराची तात्कालिक लक्षणे आहेत त्यासाठी सम्यक परिवर्तनाचा विचार आणि कृती हवी.

**संदर्भसूची.**

१. Census of India (Procisional population Totals of Maharashtra)
२. मुळ्ये संजीवनी ,2012, 'पुरोगाम्यांच्या लोकी, नकोषा झाल्या लेकी' दै. सकाळ, 14 फेब्रुवारी.
३. Subbalakshmi A., 2012, "Gender Inequality" The Hindu, Sept. 27.
४. कर्वे इरावती,1962, 'मराठी लोकांची संस्कृती', देषमुख आणि कंपनी, पुणे, पृ.6.7.
५. भागवत विद्युत, 2006,'गरज सम्यक परिवर्तनाच्या कृतीची' दै. सकाळ, 29 डिसेंबर.
६. Census of India(Provisional Population Totals of Maharashtra)
७. www.timesof india.com
८. जोषी तर्कतीर्थ श्री. लक्ष्मणषास्त्री, 1976, 'मराठी विष्वकोष', महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, खंड.15, पृ.872.